■ POSTEL REGD NO. AKOLA DN./285/2022-2024

साप्ताहिक

स्थापना : जुन २००८

# पिंगलाक्षी एक्सप्रेस



मुख्य संपादक : गजानन बानोरे 9420100590, 9075407343 R.N.I. No. MAHMAR/2008/24720

● रिसोड जि.वाशीम ● वर्ष १७ ● अंक ३७ ● मंगळवार, दि. २८ जानेवारी २०२५ ● पृष्ठे ४ ● किंमत १ रु

## एमएसएटी परीक्षेत आसुष मापारी यांची नेत्रदीपक कामगिरी

रिसोड : डॉ. होमीभाभा फॉउंडेशन ,मुंबई द्वारा आयोजित मॅथ सायन्स अभियोग्यता चाचणी मध्ये स्व.माणिक पोदार लर्न स्कूल,वाढोणाची यशस्वी कामगिरी विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या गणितीय आणि वैज्ञानिक संकल्पना विकसित करण्यासाठी या परीक्षेचे आयोजन देशपातळीवर करण्यात येत असते. MSAT अभ्यासक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी त्यांच्या सध्याच्या शैक्षणिक स्तरापर्यंत अभ्यास केलेल्या गणित आणि विज्ञानातील सर्व विषयांचा समावेश होतो.



हे विषय आणि राज्य मंडळांनी मंजूर केलेल्या अभ्यासक्रमाच्या पाठ्यपुस्तकांमधून थेट काढले जातात, या परीक्षेमध्ये संबंधित वर्गाच्या अभ्यासक्रमानुसार गणित आणि विज्ञान विषयांचा समावेश असेल, ज्यामध्ये राज्य आणि ऍँ पाठ्यपुस्तकांमध्ये शिकवले जाणारे सर्व अध्याय आणि संकल्पना समाविष्ट असतात.विद्यार्थ्यांनी त्यांच्या नियमित अभ्यासातून प्राप्त केलेल्या ज्ञानाची आणि कौशल्यांची चाचणी या परीक्षेत घेतली जाते .परीक्षेच्या सर्वसमावेशक तयारीसाठी विद्यार्थ्यांना त्यांची पाठ्यपुस्तके आणि क्लास नोट्सचा संदर्भ घेण्यासाठी प्रोत्साहित केले जाते. या परीक्षेमध्ये स्व. माणिक पोदार लर्न स्कूल,वाढोणा मधील विद्यार्थी आयुष सचिन मापारी वर्ग ७ वा याने नेत्रदीपक कामगिरी करून शाळेचे व पालकांचे नाव उंचावले आहे. जवळपास १,६९,१०० एक लाख एकोणसत्तर हजार शंभर विद्यार्थ्यांमधून आयुष ची मुलाखतीसाठी निवड झाली. दुसऱ्या फेरीसाठी महाराष्ट्रामधून आयुष ८ व्या क्रमांकावर यशस्वी झाला. या यशस्वी कामगिरीमुळे आयुष ची झोनल मध्ये निवड झाली आहे. डॉ. होमीभाभा फॉउंडेशन च्या वतीने ट्रॉफी आणि प्रमाणपत्र देऊन आयुष्य चा सन्मान मुंबई येथे करण्यात येणार आहे. आयुषने आपल्या यशाचे श्रेय आई - वडील शाळा प्रशासन,शिक्षकांना दिले आहे. (श.प्र..)

## ऋषिवट महिला शाखेत हळदी कुंकू उत्साहात



रिसोड : रिसोड येथील दि ऋषिवट अर्बन को ऑप. क्रेडीट सोसायटी लि. रिसोड च्या महिला शाखेच्या वतीने रविवार १९ जानेवारी २०२५ रोजी मकर संक्रांत निमित्त हळदी कुंकू कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी महिला शाखेच्या शाखा सभापती सौ. जयश्रीताई देशमुख होत्या तर संचालिका सौ. वीणाताई माहुरकर, पुष्पाताई करवा, सौ. शिलाताई उकळकर, सौ. सुरेखाताई तोष्णीवाल, सौ. वर्षाताई ईरतकर तसेच शाखा व्यवस्थापिका सौ. रेखाताई बेदरे यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमासाठी आलेल्या महिलांना हळदी कुंकू, तिळगुळ आणि वाण देण्यात आले. अतिशय उत्साहात आणि खेळीमेळीच्या वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमाला शहरातील असंख्य महिलांनी उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ऋषिवट महिला शाखेचे सर्व संचालक मंडळ आणि कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले. श.प.

## २०० घरटी व पाणवठे उभारण्याचा निर्धार

रिसोड : शहरात पाण्याचा प्रश्न गंभीर होत चालला आहे. पाण्याची पातळी खोल जात असल्याने टँकर आणि साठ्यावर अवलंबून राहावे लागत आहे. पशुपक्षी व गुराढोरांसाठी हा प्रश्न अधिक बिकट आहे. झाडे तोडून व सिमेंटच्या जंगलांनी त्यांचे नैसर्गिक निवासस्थान हिरावून घेतले आहे. परिणामी, सकाळ-सायंकाळ ऐकू येणारी पक्ष्यांची चिवचिवाट जवळपास थांबली आहे. या गंभीर स्थितीत नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा विभागातील कर्मचारी विनोद बांगर यांनी पुढाकार घेतला आहे. मागील वर्षी नवचेतना मित्रपरिवार या समूहाच्या सहकार्याने २२ पाणवठे उभारून गुराढोरांना पाण्याची सोय उपलब्ध करून दिली. यंदा पक्ष्यांसाठी किमान २०० घरटी आणि पाण्यासाठी पाणवठे उभारण्याचा संकल्प त्यांनी केला आहे.




**२००**

घरटी व पाणवठे उभारण्याचा निर्धार बांगर यांनी केला.

### पक्ष्यांसाठी राबवा उपक्रम

झाडांची तोड थांबवून अधिकाधिक झाडे लावावीत, ज्यामुळे पक्ष्यांना घरटे बांधण्यासाठी जागा उपलब्ध होईल.

**उन्हाळ्यात पक्ष्यांसाठी पाण्याच्या पाणवठे उभारावेत. घराच्या गॅलरीत किंवा बागेत पाण्याची सोय करावी.कृत्रिम घरटी तयार करून ती झाडांवर किंवा घराजवळ ठेवा, ज्यामुळे पक्ष्यांना आश्रय मिळेल.हे प्रयत्न पक्ष्यांच्या अस्तित्वासाठी महत्त्वाचे ठरू शकतात.**

### दानशूर व्यक्तीचा प्रतिसाद

या उपक्रमासाठी दानशूर व्यक्ती आणि नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. ज्यांना आपल्या अंगणात पक्षांची चिवचिवाट पुन्हा ऐकायची आहे, त्यांनी विनोद बांगर यांच्याशी संपर्क साधून या मोहीमेत सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले असून अनेक जणांनी यामध्ये सहभाग दर्शविला आहे.



"झाडांची तोड थांबली नाही, पण त्याचा फटका पक्ष्यांना बसला आहे. त्यांना आश्रय व पाणी देण्यासाठी घरटी व पानवटे उभारण्याचा निर्धार केला आहे.

-विनोद बांगर, पशुमित्र, रिसोड

## पात्र लाभार्थ्यांनी घरकुलाचे प्रस्ताव सादर करावे

### गटविकास अधिकारी लहाने यांचे आवाहन

रिसोड : गरजू नागरिकाला आपल्या हक्काचे पक्के घर मिळावे यासाठी सरकारने सन २०२४- २५ या वर्षाकरिता रमाई आवास योजना अंतर्गत शासन स्तरावरून जिल्ह्याला घरकुलाचे उद्दिष्ट प्राप्त झाले आहे. त्यानुसार रिसोड तालुक्याला रमाई आवास योजनेंतर्गत ५ हजार आठशे शहाण्णव घरकुलाचे उद्दिष्ट प्राप्त झाले तसेच शबरी आवास योजनेंतर्गत देखील तालुक्याला २५० घरकुलाचे उद्दिष्ट प्राप्त झाले आहे.



त्यानुसार तालुक्यातील पात्र घरकुल लाभार्थ्यांनी लाभ घेण्याचे आवाहन रिसोड पंचायत समितीचे गटविकास अधिकारी किशोर लहाने यांनी केले आहे. सन २४-२५ अंतर्गत रमाई आवास योजनेंतर्गत अनुसूचित जाती, जमातीच्या पात्र लाभार्थ्यांना आवास योजनेचा लाभ मिळावा या हेतूने शासनाकडून मंजुरात मिळाली असून तालुक्यातील सर्व पात्र रमाई आवास योजना तसेच शबरी आवास योजना अंतर्गत पात्र लाभार्थीनी आपल्या ग्राम पंचायतच्या सचिव तसेच ग्राम रोजगार सेवक यांचेकडे आपला परिपूर्ण प्रस्ताव देऊन लाभ घेण्याचे आवाहन पंचायत समिती प्रशासनाच्या वतीने गटविकास अधिकारी यांनी केले आहे. तसेच प्रधानमंत्री आवास योजना टप्पा २ अंतर्गत देखील रिसोड तालुक्याला जवळपास सहा हजार घरकुलाचे उद्दिष्ट पंचायत समितीला प्राप्त होणार असल्याचे गटविकास अधिकारी किशोर लहाने यांनी सांगितले आहे. दहा वर्षपूर्वीचे अतिक्रमणाचे नियमाकुलचे प्रस्ताव मंजुरीसाठी वरिष्ठ पातळीवर पाठविण्यात आले आहेत. जी. प्लस १ अंतर्गत लाभार्थी लाभ घेऊ शकतात. ज्या लाभार्थ्यांकडे घरकुलाचा लाभ घेण्यास जागा उपलब्ध नाही त्यांनी आपल्या कुटुंबातील सदस्यांच्या नावे पक्के घर असेल तर त्यावर त्यांच्या संमतीने पहिला मजला घरकुल योजनेतून बांधता येतो. पंडित दीनदयाळ उपाध्याय योजना अंतर्गत जागा खरेदी करण्यासाठी एक लाख रुपयांचे अनुदान मिळू शकते आपल्या गावाच्या सचिव, तसेच ग्राम रोजगार सेवक यांच्याकडे परिपूर्ण प्रस्ताव सादर करावे. दलालांच्या कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता पार दर्शकपणे लाभ मिळणार आहे. ता.प.

## डॉ. माया वाठोरे यांना जिल्हा युवा पुरस्कार

### वाशिममध्ये उत्साहात पार पडला युवा पुरस्कार सोहळा; उल्लेखनीय कार्याची दखल

**वाशिम, दि. २६ जानेवारी:** आज सकाळी वाशिम येथे उत्साहात पार पडलेल्या युवा पुरस्कार सोहळ्यात डॉ. माया रमेश वाठोरे रा. माया निवास, नालंदा नगर, वाशिम) यांना २०२२-२३ या वर्षाचा प्रतिष्ठित 'जिल्हास्तर युवा पुरस्कार' प्रदान करण्यात आला. समाजसेवेतील त्यांच्या उल्लेखनीय योगदानाला गौरवण्यासाठी हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

प्रजासत्ताक दिनाच्या पावन पर्वावर, वाशिमच्या पोलीस मुख्यालयाच्या प्रांगणात आज सकाळी एका शानदार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यात वाशिमचे पालकमंत्री आणि जिल्हाधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत डॉ. माया रमेश वाठोरे यांना 'जिल्हास्तर युवा पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. डॉ. वाठोरे यांनी समाजासाठी केलेल्या कार्याची



दखल घेत जिल्हा युवा पुरस्कार निवड समितीने त्यांची या पुरस्कारासाठी निवड केली होती. डॉ. वाठोरे यांनी अनेक वर्षांपासून समाजसेवेत सक्रिय योगदान दिले आहे. त्यांनी विशेषतः युवा पिढीच्या उन्नतीसाठी आणि समाजाच्या कल्याणासाठी अनेक महत्त्वपूर्ण कार्ये केली आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला, ज्यामुळे इतरांनाही समाजसेवेची प्रेरणा मिळेल.

### युवा पिढीला एक नवीन दिशा

■ केली आहे. त्यांचे कार्य केवळ वाशिम जिल्ह्यासाठीच नव्हे, तर संपूर्ण राज्यासाठी प्रेरणादायी आहे. त्यांनी युवा पिढीला एक नवीन दिशा दिली आहे. त्यांच्या कार्याचा गौरव करणे हे समाजाचे कर्तव्य आहे. त्यांच्या कार्यामुळे अनेक लोकांच्या जीवनात सकारात्मक बदल झाला आहे. हा पुरस्कार त्यांच्या कार्याचा योग्य सन्मान आहे.

पुरस्कार सोहळ्याला संबोधित करताना, जिल्हाधिकाऱ्यांनी डॉ. वाठोरे यांच्या कार्याचे कौतुक केले आणि त्यांना शुभेच्छा दिल्या. पालकमंत्र्यांनीही त्यांच्या भाषणात डॉ. वाठोरे यांच्या कार्याचा गौरव केला आणि युवा पिढीला त्यांच्याकडून प्रेरणा घेण्याचा सल्ला दिला. डॉ. वाठोरे यांनी पुरस्कार स्वीकारल्यानंतर आपले मनोगत व्यक्त केले. त्यांनी हा पुरस्कार आपल्या कार्याची पावती असल्याचे म्हटले आणि यापुढेही समाजसेवेत सक्रिय राहण्याची प्रतिज्ञा केली. त्यांनी आपल्या कार्यामध्ये साथ देणाऱ्या सर्वांचे आभार मानले. या पुरस्कार सोहळ्याला वाशिम जिल्ह्यातील अनेक प्रतिष्ठित नागरिक, शासकीय अधिकारी आणि युवा कार्यकर्ते उपस्थित होते. सोहळ्याच्या आयोजनाची जबाबदारी जिल्हा क्रीडा परिषद आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाने सांभाळली होती.

# देशाची होमलँड सिक्युरिटी मजबुत करण्याकरता अमेरिकेच्या अनुभवाचा वापर

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यात झालेल्या बैठकीत दोन्ही देशांमधील ३ अब्ज डॉलर्सच्या संरक्षण कराराची घोषणा केली गेली. ट्रम्प यांनी पाकिस्तानबाबत दहशतवादासंदर्भात कडक वक्तव्य केले आहे. दहशतवादाचे कंबरडे मोडण्यासाठी दोन्ही देश सहकार्य अजुन मजबुत करणार आहे. ‘दहशतवादाविरोधातील लढाई अद्याप संपलेली नाही . जेव्हापर्यंत दहशतवादाच्या मुळाशी आपण पोहचत नाही तेव्हापर्यंत ही लढाई चालुच राहिल. दहशतवादाला संपवण्यासाठी आपल्याला अमेरिकेच्या मार्गावर चालावे लागेल. अमेरिकेने ९/११ च्या दहशतवादी हल्ल्यानंतर दहशतवादाला संपुष्टात आणण्यासाठी कठोर पावले उचलली होती. जोपर्यंत दहशतवादाला प्रोत्साहन देणारा देश आहे, तोपर्यंत आपल्याला या धोक्याचा सामना करतच राहावा लागेल. दहशतवादाला प्रोत्साहन देणाऱ्या देशाला राजकीय स्तरावर धडा शिकवायलाच हवा.अमेरिकेने दहशतवादाविरोधात वैश्विक युद्ध छेडले होते. दहशतवाद संपवण्यासाठी दहशतवाद्यांबरोबर त्यांना फंडिंग करणाऱ्यांनाही शिक्षा व्हायला हवी. दहशतवादी कारवायांमध्ये अडकलेल्या संघटनांना आपली कृत्ये थांबवावीच लागतील. ९/११ च्या दहशतवादी हल्ल्यानंतर अमेरिकेने नेमके काय केले ज्यामुळे त्यानंतर अमेरिकेत दहशतवादी हल्ला झाला नाही?भारत अमेरिकेच्या ऊपाय योजना वापरुन दहशतवाद थांबवु शकतो का या सगळ्या पैलुंवर विचार करावा लागेल.

९/११ नंतर अमेरिकेने एक डिपार्टमेंट ऑफ होमलँड सिक्युरिटी (डी.एच.एस.) खाते निर्माण केले. त्याने कायद्याची अंमलबजावणी करणार्या, सीमा संरक्षण करणार्या आणि संबंधित विषयांतील,सगळ्या दलांना एका छत्राखाली आणले. त्यांचे घोषित उद्दिष्ट, अमेरिकस विस्कळित करू पाहणार्या शक्तींविरोधात देशाचे संरक्षण करण्याचे आहे. हे एक एकीकृत खाते आहे, ज्यात २,२५,००० कर्मचारी काम करतात. खाते असंख्य मुद्दे हाताळते. ज्यात सीमाशुल्क, सीमा संरक्षण,देशांतरण, सागरी सुरक्षा, सायबर सुरक्षा, आण्विक वा जैव वा रासायनिक हल्ले, कायदा व सुव्यवस्था, अंमली पदार्थविरोधी, आपत्ती व्यवस्थापन आणि वाहतूक सुरक्षा यांचा अंतर्भाव आहे. खाते मोठ्या संख्येतील केंद्र व राज्य तसेच स्थानिक संस्थांसोबत समन्वयन साधते. खात्याचा वार्षिक अर्थसंकल्प ५० अब्ज डॉलर्सचा असतो. अमेरिका अवैध देशांतरितांच्या आव्हानांचा सामना करत आहे. निरनिराळ्या अनुमानांमुसार सुमारे १.१ कोटी अवैध नागरिक अमेरिकेत राहत आहेत. त्यापैकी ५७% मेक्सिकोतील आहेत. सीमांवर शस्त्रास्त्रे व अंमली पदार्थांची तस्करी होतच असते. २००८-२००९ मध्ये, अमेरिकेतील प्रवेशद्वारांचे रक्षण करणार्या, अमेरिकन सीमाशुल्क आणि सीमा संरक्षण (सी.बी.पी.- कस्टम्स अँड बॉर्डर प्रोटेक्शन) अधिकरणाने, ९,११,८०० किलोग्रॅम अंमलीपदार्थ आणि ५,५६,००० ‘बाहेरच्यांना’ पकडले होते. त्याच वर्षी अधिकरणाने ३६.१ कोटी पादचार्यांना आणि प्रवाशांना निरनिराळ्या प्रवेशद्वारांतून अमेरिकेत येतांना हाताळलेले आहे.

देशांतरण आणि सीमाशुल्क कायद्यांची कठोर अंमलबजावणी ही, सीमा संरक्षणाचा एक महत्त्वाचा भाग आहे. ९/११ नंतर अमेरिकेने देशांतरण आणि सीमाशुल्क अंमलबजावणी (इम्मिग्रेशन अँड कस्टम्स एन्फोर्समेंट) दल,ही एक खात्यांतर्गतची सर्वात मोठी तपास संस्था, २००३ साली निर्माण केली.

## सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्यावतीने ‘घर घर संविधान’ उपक्रम

वाशिम, दि. २४ जानेवारी (जिमाका) : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्यावतीने 'घर घर संविधान' उपक्रमांतर्गत सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभागाच्यावतीने प्रजासत्ताक दिनी पालकमंत्री तसेच जिल्ह्यातील ज्येष्ठ नागरिकांना संविधानाची प्रत देवून संविधानाचा जागर करण्यात येणार असल्याची माहिती समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त मारोती वाठ यांनी दिली आहे.

तसेच जिल्ह्यातील सर्व शाळा, महाविद्यालये व सर्व शासकीय/ निमशासकीय कार्यालयांमध्ये ध्वजारोहणानंतर संविधाच्या उद्देशपत्रिकेचे वाचन करण्यात येणार येवून संविधान जागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.

## बाळासाहेब ठाकरे व सुभाषचंद्र बोस जयंती साजरी



**रिसोड** : श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय रिसोड येथे हिंदुरहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे व आझाद हिंद सेनेचे संस्थापक स्वातंत्र्यसेनानी सुभाषचंद्र बोस यांची जयंती साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य संजय देशमुख व ज्येष्ठ प्राध्यापक संतोष खानझोडे यांच्या हस्ते स्वातंत्र्य सेनानी सुभाषचंद्र बोस व हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी बोलताना प्राचार्य संजय देशमुख यांनी सांगितले की सुभाषचंद्र बोस यांनी कलकत्यातील आपले शिक्षण पूर्ण केल्या नंतर पुढील उच्च शिक्षण इंग्लंडला घेतले. त्यांनी कुशाग्र बुद्धिमत्ता व कठोर परिश्रमाला अभ्यासाची जोड दिली. त्यामुळेते आय. सी. एस. परीक्षा पास झाले. त्यांनी इंग्रजांची नोकरी पत्करली पण त्यात त्यांचे मन रमले नाही. तेथील नोकरी सोडून ते मायदेशी परतले. मायदेशी आल्यानंतर गांधीजींच्या विचारांनी प्रेरित होऊन त्यांनी स्वातंत्र्यचळवळीत भाग घेतला. स्वातंत्र्यचळवळीत भाग घेण्यासाठी आपल्या नोकरीचा राजीनामा देणारे ते पहिले आय. सी. एस. अधिकारी होते. पुढे चालून त्यांनी गांधीजींच्या विचारांशी असहमती दर्शवत आझाद हिंद सेनेच्या माध्यमातून आपला स्वातंत्र्यलढा चालू ठेवला, तसेच बाळासाहेबठाकरे यांच्या बद्दल बोलताना प्राचार्य संजय देशमुख म्हणाले की बाळासाहेब ठाकरे यांचा जीवन प्रवास हा व्यंगचित्रकार, पत्रकार ते शिवसेना प्रमुख पर्यंतचा नेहमीच लक्षात राहणारा आहे. तसेच बाळासाहेब ठाकरे हे मराठी माणसाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहले, त्यांच्या हक्कासाठी झटले. १९९६ पासून ते पक्षाची स्थापना झाल्यानंतर २०१२ पर्यंत त्यांनी पक्षाची कमान सांभाळली. ठाकरे परिवाराचा आणि राजकरणाचा संबंध हा अगदी जवळचा असून महाराष्ट्राच्या राजकरणात त्यांचे योगदान आहे. (ता.प्र..)




**पिंगलाक्षी एक्सप्रेस** (मराठी साप्ताहिक ) I R.N.I. No. MAHMAR/2008/24720

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक गजानन श्रीराम बानोरे यांनी दिप प्रिंटर्स (मुद्रक - राम उत्तमराव सालवणकर) वारा जहां. ता.जि.वाशीम येथे छापून कार्यालय, साप्ता. पिंगलाक्षी एक्सप्रेस, सिध्दी विनायक शिक्षक कॉलनी, मु.पो. ता. रिसोड जि. वाशीम (महा.) येथून प्रकाशित केले. (सर्व वाद रिसोड न्यायालया अंतर्गत) प्रकाशित असलेल्या सर्व लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी.आर.बी. ॲक्ट नुसार संपादक जबाबदार)

# रामेश्वर विद्यालयात हळदी कुंकू कार्यक्रम



**रिसोड :** रामेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय मोठेगाव येथे हळदीकुंक या कार्यक्रमाचे आयोजन केले होते .

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुमनताई काशीराव देशमुख या होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून सिंधुमामी दिनकरराव देशमुख, निकिताताई गणेशराव देशमुख , शोभाताई कष्टे, साधनाताई थांडे,. रामलीलाताई देशमुख कुसुमताई देशमुख . मीरा कष्टे, कार्यक्रमाच्या सुरुवातीला कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांनी राजमाता राष्ट्रमाता जिजामाता यांच्या प्रतिमेचे पूजन केले कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांचे स्वागत विद्यालयातील शिक्षकानी केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.दिपाली जोगदंड यांनी केली आभार प्रदर्शन कु. वंदना खोटे यांनी केले हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.(ता.प्र..)

# स्वामी विवेकानंद विद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात

**रिसोड/ तालुका प्रतिनिधी-** स्वामी विवेकानंद माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय व्याड येथे दि. २४ जानेवारी शुक्रवारी सांस्कृतिक कार्यकर्माचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष ?ड दिलीपराव सरनाईक तर प्रमुख अतिथी व्याड येथील युवा समाजसेवक ज्ञानेश्वर बोंडे, प्राचार्य एस डी जाधव मंचावर उपस्थित होते. ॲड दिलीपराव सरनाईक यांनी मनोगत व्यक्त करताना बदललेल्या शैक्षणिक वातावरनानुसार शिक्षक व विद्यार्थ्यांनी स्वतःच बदल करुन घेऊन अपेक्षित शैक्षणिक विकार करुन घेतला पाहिजे, शाळेत घेतले जाणारे सांस्कृतिक कार्यक्रम हे आपल्या संस्कृतीची ओळख आणि संस्कार टिकवून ठेवण्यास उपयुक्त ठरतय. तसेच क्रीडा साप्ताहामुळे शारीरिक विकास, सांघिक वृत्ती, निणऱ्यक्षमता वाढण्यास मदत होते, शालेय खेळात आपल्या क्रीडा गुण्णांचा विकास झाला तर तालुका,जिल्हा, राज्य व राष्ट्र स्तरावर खेळात सहभाग घेता





येतो. शाळेच्या कोणत्याही उपक्रमात सहभागी झाल्याने विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो आणि सर्वांगीण विकास साधला जातो.शिक्षण हे जबाबदार नागरिक म्हणून जीवन जगण्यासाठी प्रोत्साहित करते. त्यांनी येणा?्या परीक्षेला संपूर्ण तयारीने जाऊन कॉपीमुक्त अभियान यशस्वी करण्यासाठी स्वयंस्फूर्तीने सहभागी होण्याचे आवाहन केले.

सांस्कृतीक कार्यक्रमात वर्ग ५ ते १२ च्या विद्यार्थ्यांनी अतिशय सुंदर नृत्य सादर करुन उपस्थितांची मने जिंकली. संचलन प्रा. लांभाडे यांनी केले. तर शिक्षिका कु दुर्गा घोगरे, प्रवीण सरनाईक, उमेश पडघान यांनी विशेष सहकार्य केले.



कार्यक्रमाला शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक वर्ग व माजी विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

# बाळखेड जि.प. शाळेत बाल आनंद मेळावा



**रिसोड** : जिल्हा परिषद शाळा बाळखेड येथे २१ जानेवारी २०२४ रोजी बाल आनंद मेळावा संपन्न झाला. विद्यार्थ्यांच्या अंगी असणारा सुप्त गुणांना वाव मिळावा, त्यांच्यामध्ये व्यवहार ज्ञान विकसित व्हावे, कृतिशील शिक्षणातून व्यक्तिमत्त्वाचा विकास व्हावा या उद्देशाने जिल्हा परिषद शाळेमध्ये बाल आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या आनंद मेळाव्याचे उद्घाटन ग्रामपंचायतचे सरपंचराणी सचिन पऱ्हाड यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी ग्रामपंचायतचे उपसरपंच अविनाश गिरी,तंटामुक्तीचे अध्यक्ष सुशांत भारती, सचिन पऱ्हाड, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष मधुकर गायकवाड, मुख्याध्यापक गजानन पाचरणे, ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी शाळेच्या प्रांगणामध्ये आपल्या खाद्यपदार्थाची छोटी छोटी दुकाने लावून खाद्यपदार्थांची विक्री केली. यावेळी बोलताना सरपंच राणी सचिन पराड म्हणाल्या की या बाल आनंद मेळाव्यामुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होऊनआपलीच वस्तू व खाद्यपदार्थ कसे चांगले आहे हे ग्राहकांना ते पटवून देत आहेत त्यामुळे त्यांच्यातील संवाद गुणांचा विकास होतो.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक गजानन पाचारणे यांनी केले, संचलन कैलास बोडखे ,आभार प्रदर्शन रमेश बनसोडे व रफिक शहा यांनी केले. कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणामध्ये पालक वर्ग उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी खाद्य पदार्थांच्या स्टॉल्सवर गर्दी करून अनेक पदार्थ खरेदी करून त्याचा आस्वाद घेतला.**(ता प्र.)**

## पेडगाव सोनोने कुटुंबाचा स्तुत्य उपक्रम

# जुन्या प्रथा-परंपरांना फाटा देत शिक्षणासाठी पैसा खर्च करणार

रिसोड - शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, जो प्यायला तो गुरगुरल्या शिवाय राहणार नाही हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा संदेश आपल्या आयुष्यात उतरवून स्वतःच्या कुटुंबाला आणि समाजाला पुढे घेवून जाणाऱ्या पेडगावच्या सोनोने कुटुंबाने अजून एक स्तुत्य उपक्रम सुरू केला आहे.

सोनोने कुटुंबाच्या वतीने दरवर्षी २६ जानेवारीला जिल्हा परिषद शाळा पेडगांव येथील सर्व विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप केले जाते. विद्यार्थ्यांना शालेय अभ्यासा व्यतिरिक्त वाचनाची आवड लागावी तसेच थोरा-मोठ्यांमध्ये देखील वाचनसंस्कृती वाढीस लागावी म्हणून 'एकलव्य' सार्वजनिक वाचनालय कोणत्याही शासकीय मदतीशिवाय चालवले जाते. विद्यार्थ्यांना अभ्यास करतांना प्रोत्साहन मिळावे आणि त्यांनी जोमाने अभ्यास करावा या उद्देश्याने सोनोने कुटुंबाकडून असे उपक्रम राबवविले जातात. याच उपक्रमाचा पुढचा टप्पा म्हणून यावर्षी स्व.प्रल्हाद सोनोने यांचे स्मरणार्थ भारत माध्यमिक शाळा चिंचांबापेन इथून इयत्ता १० मध्ये प्रथम आलेल्या गौरव सरनाईक या विद्यार्थ्यास शुभम गणेश सोनोने यांचे हस्ते देण्यात आले.

# रिसोड नगरपरिषदेच्या स्वच्छता विभागाचे काम प्रगतीपथावर

## शहराच्या स्वच्छतेकडे नगरपरिषदेचे बारकाईने लक्ष





**रिसोड** शहराच्या प्रत्येक वार्डातील नाल्यांच्या घाणेरड्या पाण्यामुळे रस्ते घाणांनी भरले होते, यामुळे या भागातील नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला होता.'अंतर्गत शहरातील नाल्यांमधून घाणांचे साम्राज. निर्माण झाले होते. सदर बाबीची दखल घेत आरोग्य विभागातील निरीक्षक प्रतापराव देशमुख यांच्या नेतृत्वात स्वच्छता विभागाचे प्रमुख रिसोड नगरपरिषद मुख्याधिकारी तथा प्रशासक सतीश शेवदा, जमील भाई यांच्या आदेशानुसार, बंद नाल्यांची साफसफाई केली. स्वच्छता विभागातील कर्मचारी शहराच्या अंतर्गत भागात अरुंद नाल्यांमुळे कचरा अडकला होता आणि रस्त्यावर घाणीतून घाणेरडे पाणी आले होते. नगरपरिषदेच्या स्वच्छता विभागाने सदर काम प्रगतीपथावर चालू असून तर रिसोड शहरातील प्रत्येक वार्डामध्ये रोज सकाळी घंटागाडी जात असून अनेक नागरिक घंटागाडीचा कचरा टाकण्यासाठी उपयोग घेतात त्यामुळे सुद्धा शहर स्वच्छतेकडे भर पडते तर शहरातील नागरिकांकडून नगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या स्वच्छता मोहिमेमुळे समाधान व्यक्त केल्या जात आहे .

नागरिकांनी कचरा कचरा गाड्यांमध्येच टाकावा नाली मध्ये टाकू नये कारण नाली मध्ये कचरा टाकल्यानंतर त्यामध्ये पाणी तुंबत आहे यामुळे विविध प्रकारचे किटाणू व मच्छर निर्माण होतात

सतीश शेवदा मुख्याधिकारी
तथा प्रशासक नगरपरिषद रिसोड

नगरपरिषदेच्या आरोग्य विभागाचे लक्ष शहराच्या स्वच्छतेकडे बारकाईने असून नागरिकांनी सुद्धा आपल्या घरातील कचरा घंटागाडीतच टाकावा कोणीही कचरा रस्त्यावर किंवा नालीत टाकू नये तसेच शहरातील नागरिकांनी नगरपरिषदेला सहकार्य करावे .

रोहित बडेल
आरोग्य विभाग अधिकारी नगरपरिषद रिसोड

विभाग बारकाईने लक्ष घालून काम करत आहे नागरिकांनीही योग्य ती काळजी घ्यावी कचरा नालीमध्ये टाकू नये व तथा घाण पाणी रस्त्यावर टाकू नये

प्रतापराव देशमुख
.आरोग्य निरीक्षक नगरपरिषद रिसोड

# महारेशीम अभियान : शेतीपूरक जोड व्यवसायासाठी संपर्क साधावा

वाशिम,दि.२४ जानेवारी (जिमाका) महाराष्ट्र शासन वस्त्रोद्योग विभाग, रेशीम संचालनालय, नागपूर यांचे मार्फत जिल्हा रेशीम कार्यालया मार्फत महारेशीम अभियान ९ फेब्रुवारी २०२५ अखेर राबविण्यात येत आहे.

शेतकरी बंधूनी शेती पुरक जोडधंदा रेशीम उद्योग करणेसाठी नोंदणी जिल्हा रेशीम कार्यालय, उत्नेमाले बंगला, पुसद नाक्याजवळ, वाशिम येथे करावी. अधिक माहितीसाठी जिल्हा रेशीम अधिकारी सुनिलदत्त फडके यांचेशी संपर्क साधावा. असे आवाहन करण्यात आले आहे.

# संत नामदेव महाराज संस्थान तर्फे सभापती यांचा सत्कार



**रिसोड :** वारकरी संप्रदायाचे प्रचारक ,महाराष्ट्रातील एक थोर श्री संत महाराज ट्रस्ट नरसी नामदेव संस्थांन ला भूमिपुत्र संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा रिसोड बाजार समितीचे सभापती विष्णुपंत भुतेकर यांनी २१ जानेवारी रोजी हिंगोली दौरा दरम्यान भेट दिली. यावेळी संस्थांच्या वतीने रिसोड कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती विष्णुपंत भुतेकर यांचा शाल श्रीफळ व संत नामदेव महाराजांची मूर्ती देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी संस्थांचे सचिव माधवराव पवार पुरुषोत्तम गडदे खंडू पाटील शशिकांत गवते अर्जुन गिरी आदींची उपस्थिती होती याप्रसंगी सभापती विष्णुपंत भूतेकर यांच्यासह रिसोड तालुका मतदार संघाचे सतीश मांदळे महावीर सिंग ठाकूर रामेश्वर हेद्रे आदींची उपस्थिती होती. ता.प.

# उल्हास नवभारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत स्वयंसेविकांचा सत्कार

रिसोड, दि. २५ (प्रतिनिधी)

उल्हास नवभारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत निजामपूर येथील जिल्हा परिषद केंद्र शाळेत स्वयंसेविकांचा प्रशस्तीपत्र, मेडल, शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास उपस्थित रिसोड पंचायत समितीच्या माजी सभापती केसर हाडे, गटशिक्षणाधिकारी कोकाटे,सरपंच उषा जाधव, मंजुषा काळे,विषयतज्ञ सुनील दाभाडे, विस्तार अधिकारी उमाळे, सरकटे, डिगांबर जाधव, आयुष कांबळे यांच्याहस्ते सोनाली वाघमोडे, श्रुती बुधनेर, जया बाबर, शिवकन्या बाबर, अश्विनी पवार, सोनाली गोल्हारे, वैशाली पिंगळे, राखी मिटकरी, वेदिका गोल्हारे यांना महत्वपूर्ण योगदानाबद्दल गौरविण्यात आले.२०२७ पर्यंत गावातील निरक्षर व असाक्षर यांना साक्षर करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य स्वयंसेविकांना करायचे आहे. कार्यक्रमाचे संचलन अर्जुन वरघट यांनी केले. तर आभार प्रदर्शन धीरज जाधव यांनी मानले. शिक्षक इंगोले,संबळे,वाबळे यांची याप्रसंगी उपस्थिती होती.



